सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ८९ | शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



श्री. भिला पाटील
सामाजिक कार्यकर्ता, पैलाड, अमळनेर.



श्री. गुणवंत पाटील
सामाजिक कार्यकर्ता, पैलाड, अमळनेर.

## दिनविशेष
२० डिसेंबर

- आंतरराष्ट्रीय मानव ऐक्य दिन
- मुंबई-बेंगलोर प्रवासी विमानसेवा सुरू झाली.
- यामिनी कृष्णमूर्ती पद्मश्री भरतनाट्यम व कथ्थक नर्तिका यांचा जन्म.
- शिवकांत तिवारी भारतीय वकील यांचा जन्म.
- छत्रसाल बुंदेला बुंदेलखंडचे महाराजा यांचे निधन.
- उपेंद्रकिशोर रे भारतीय चित्रकार आणि संगीतकार यांचे निधन.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

थंडीसाठी शक्तिवर्धक आणि औषधी कुळीथाचे माडगे-सूप! पान २ वर

पौष अमावास्येला पूर्वजांसाठी करा तर्पण; दूर होईल पितृ दोष आणि मिळेल मोक्ष! पान ४ वर

# मंगळ ग्रह सेवा संस्थेच्या टीमने सुवर्णपदक विजेते निरजजी चोप्रा यांच्या परिवाराची घेतली भेट

## साधेपणाने विवाह केल्याबद्दल केला सत्कार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संपूर्ण भारताचा अभिमान असलेले ऑलिंपिक सुवर्णपदक विजेते नीरजजी चोप्रा यांनी १६ जानेवारी २०२५ रोजी हिमाचल प्रदेशातील शिमला येथे अत्यंत साध्या व पारंपरिक पद्धतीने कु. हिमानी मोर यांच्याशी विवाह केला. फक्त कुटुंबीयांच्या उपस्थितीत, कोणताही दिखाऊपणा न करता व हुंडा नाकारून केवळ १ शगुन स्वीकारत केलेला हा विवाह भारतीय संस्कृती, मूल्ये व कुटुंबव्यवस्थेचे उदाहरण ठरला आहे. या पार्श्वभूमीवर येथील मंगळ ग्रह सेवा संस्थेने सोमवार, दि. १५ डिसेंबर रोजी नीरजजी चोप्रा यांच्या पानिपत (खंद्रागाव) येथील निवासस्थानी जाऊन कुटुबियांची भेट घेऊन सत्कार केला. तब्बल १ हजार १४१ किलोमीटर अंतरावर असलेल्या एका मंदिर संस्थेने थेट घरी जाऊन केलेला हा सत्कार देशातील पहिलाच उपक्रम असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.



*खंद्रागाव, जि. पानिपत (हरियाणा) : सुवर्णपदक विजेते निरजजी चोप्रा यांचे आजोबा धर्मसिंग चोप्रा व काका सुरेंद्रजी चोप्रा यांच्या भेटीप्रसंगी उपस्थित मंगळ ग्रह सेवा संस्थेचे जनसंपर्क अधिकारी श्री. शरद कुळकर्णी, सेवेकरी श्री. आशिष चौधरी व श्री. दत्तात्रय पवार.*

या सत्कारासाठी मंगळ ग्रह सेवा संस्थेचे जनसंपर्क अधिकारी श्री. शरद कुलकण, सेवेकरी श्री. दत्तात्रय पवार, सेवेकरी श्री. आशिष चौधरी यांनी पानिपत येथे नीरज चोप्रा यांच्या कुटुबीयांची भेट घेतली. याप्रसंगी नीरजजी चोप्रा यांचे आजोबा धर्मसिंग चोप्रा व काका सुरेंद्रजी चोप्रा यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी मंगळ ग्रह सेवा संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी सुरेंद्रजी चोप्रा यांनी सांगितले, की अठरा वर्षांपूर्वी मी स्वतः पाच जणांच्या उपस्थितीत केवळ एक रुपया शगुन घेऊन विवाह केला होता. त्या वेळी समाजाकडून मोठा विरोध सहन करावा लागला. मात्र, नीरजने हीच परंपरा पुढे नेत समाजासमोर आदर्श पायंडा घातला आहे.

### साधेपणा, शेती आणि मूल्यांची जपणूक

या भेटीदरम्यान उपस्थित सेवेकऱ्यांनी चोप्रा कुटुंबीयांचा अनुभव कथन करताना सांगितले की, जागतिक कीर्ती मिळवूनही हे कुटुंब आजही गावातच वास्तव्यास आहे. त्यांची शेतीशी नाळ जोडलेली आहे. अवघ्या १ हजार ६०० लोकसंख्या असलेल्या छोट्या गावात नीरजजी चोप्रा यांचे साधे, प्रशस्त व एकत्र कुटुंबाचे घर पाहून सर्वजण भारावून गेले. गावातील मुलांना खेळाचे प्रशिक्षण देणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि गाव सोडून महानगरांकडे न धावता आपल्या मातीशी नाते जपणे हे या कुटुंबाचे वैशिष्ट्य असल्याचे दिसून आले.

### मंगळ ग्रह सेवा संस्थेचा सामाजिक संदेश

या प्रसंगी मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे शाल व श्रीफळ, श्री मंगळ ग्रह देवतेची प्रतिमा, छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनाधिष्ठित पुतळा, सन्मानपत्र देऊन चोप्रा कुटुंबाचा गौरव करण्यात आला. श्री. शरद कुलकर्णी यांनी सन्मानपत्राचे वाचन करून मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या हुंडामुक्त, साध्या विवाहाची शपथ व इतर सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. श्री दत्तात्रय पवार यांनी मंदिरातील विविध सामाजिक, धार्मिक व जनजागृती कार्यक्रमांचा आढावा मांडला.

### श्री मंगळ ग्रह मंदिर दर्शनाचे निमंत्रण

या सत्कारामुळे प्रभावित होऊन नीरज चोप्रा यांचे आजोबा व काका सुरेंद्रजी चोप्रा यांनी संपूर्ण कुटुंबासह श्री मंगळ ग्रह मंदिरात दर्शनासाठी अवश्य येऊ, असे आश्वासन दिले. आंतरराष्ट्रीय वेळापत्रकामुळे व्यस्त असलेल्या नीरजजी चोप्रा यांची प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही. मात्र, त्यांच्या कुटुंबियांनी मंदिराच्या सामाजिक कार्याचे मनापासून कौतुक केले.

> एवढ्या मोठ्या खेळाडूच्या घरी जाऊन आपल्याला वेळ दिला जाईल की नाही, ही शंका मनात होती. मात्र, जमिनीवर पाय ठेवून जगणारे लोकच खऱ्या अर्थाने खूप महान असतात, हे चोप्रा कुटुंबीयांनी सिद्ध केले. या उपक्रमातून साधा विवाह, हुंडामुक्त समाज व भारतीय संस्कृतीचे जतन हा संदेश संपूर्ण देशभर पोहोचविण्याचा संकल्प श्री मंगळ ग्रह सेवा संस्थेने पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.
>
> **– आशिष चौधरी, सेवेकरी, मंगळ ग्रह सेवा संस्था.**

> श्री मंगळ ग्रह मंदिर येथे अभिषेक करणाऱ्या सर्व भाविकांना " हुंडा देणार नाही हुंडा घेणार नाही. भारतीय परंपरेला अभिप्रेत असलेल्या आदर्श कुटुंब व्यवस्थेचे जतन करू. कौटुंबिक हिंसाचार होऊ देणार नाहीत. सुनेला मुलीसारखे वागवू. आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवणार नाहीत. " यासारख्या अनेक आदर्श बाबींची शपथ दिली जाते. आम्ही मंगळ ग्रह सेवा संस्थेच्या माध्यमातून राबवित असलेल्या या काळाची गरज असलेल्या उपक्रमाला पूरक असलेले कार्य मा. श्री. नीरजजी चोप्रा यांनी केल्याने आम्ही त्यांच्या घरी जाऊन त्यांचा सत्कार केला. चोप्रा परिवाराच्या आदरातिथ्याने आम्ही भाराऊन गेलो आहोत. यासाठी आम्हाला केंद्रीय क्रीडामंत्री श्रीमती रक्षाताई खडसे व त्यांचे स्वीय सहाय्यक विजय देशमुख यांचे अनमोल सहकार्य लाभले.
>
> **– श्री. शरद कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी, मंगळ ग्रह सेवा संस्था.**

# मांडळ अवैध वाळू हल्ला प्रकरण

# आरोपींवर एमपीडीए, मोक्कांतर्गत कठोर कारवाई करावी

## अमळनेरला ग्राम महसूल अधिकाऱ्यांची धरणे आंदोलनात मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील मांडळ येथे अवैध वाळू वाहतुकीवर कारवाईसाठी गेलेल्या महसूल पथकावर वाळूमाफियांनी सशस्त्र जिवघेणा हल्ला केला होता. ही घटना रविवार, दि. ७ डिसेंबर रोजी घडली होती. या घटनेच्या निषेधार्थ अमळनेर तालुका ग्राम महसूल अधिकारी संघातर्फे शुक्रवार, दि. १९ डिसेंबर रोजी सकाळी तहसील कार्यालयाच्या आवारात एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. आरोपींवर एमपीडीए व मोक्कांतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदनही देण्यात आले.




निवेदनात म्हटले आहे, की मांडळ परिसरात यापूर्वीही वाळू तस्करीशी संबंधित गंभीर गुन्हे घडले आहेत. त्यामुळे महसूल कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेतील आरोपींवर गुन्हे दाखल करावेत. एमपीडीए व महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा (मोक्का) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी. सर्व आरोपींना मुद्देमाल व शस्त्रासह अटक होईपर्यंत कामबंद आंदोलन सुरूच राहील. आंदोलनात ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, अव्वल कारकून व नायब तहसीलदार सहभागी झाले आहेत. निवडणूक व नैसर्गिक आपत्तीशी संबंधित अत्यावश्यक कामकाज वगळता इतर सर्व कामकाज बंद ठेवण्यात आले आहे.

याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष पुरुषोत्तम पाटील, उपाध्यक्ष एम. आर. पाटील, सचिव मुकेश देसले, संघटक विठ्ठल पाटील, विभागीय उपाध्यक्ष भूषण पाटील, जिल्हा प्रतिनिधी प्रवीण खंडारे, कार्याध्यक्ष योगेश पाटील आदी उपस्थित होते. प्रांताधिकारी मयूर भंगाळे व तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.




# प्रभाग क्र. १ (अ) नगरसेवक पदासाठी आज मतदान

## एका जागेसाठी तीन महिला उमेदवार रिंगणात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : न्यायालयीन प्रक्रियेमुळे येथील पालिकेची प्रभाग क्र. १ची (अ) निवडणूक स्थगित करण्यात आली होती. यासाठी शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. एका नगरसेवक पदासाठी तीन महिला उमेदवार रिंगणात आहेत.

प्रभाग १ मध्ये तांबेपुरा, आयोध्या नगर, रामवाडी, बंगाली फाईल, गायत्री नगर, समता कॉलनी, टाकी फाईल, आयडीपी कॉलनी भागाचा समावेश आहे. या निवडणुकीसाठी शहरातील प्रताप हायस्कूल येथे २ आणि शिवाजी हायस्कूल येथे ४ असे एकूण ६ मतदान केंद्र उभारण्यात आले आहेत. मतदान शांततेत व सुरळीत पार पडण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती तयारी करण्यात आली आहे. ३६ मतदान कर्मचारी व ६ पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे एका जागेसाठी तीन महिला उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. यात शिवसेनेच्या सरिता पवार, शहर विकास आघाडीच्या कविता राजपूत तर अपक्ष शालिनी कदम यांचा समावेश आहे. महिला उमेदवारांमधील ही चुरशीची लढत होण्याची चिन्हे आहेत. यासाठी किती टक्के मतदान होणार, निकाल काय लागणार याबाबत शहरात उत्सुकता आहे.

# पिंपळे बुद्रुक आश्रमशाळेतील खेळांडुची राज्यस्तरावर निवड

## नाशिक विभागीय क्रीडा महोत्सवात नेत्रदीपक कामगिरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत धरती आबा भगवान बिरसा मुंडा जनजातीय गौरव वर्षानिमित्त मंगळवार, दि. १६ डिसेंबर ते गुरुवार, दि. १८ डिसेंबर तीन दिवसीय विभागस्तरीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे करण्यात आले होते. या क्रीडा महोत्सवात



नाशिक विभागांतर्गत येणाऱ्या धुळे, नंदुरबार, नाशिक, कळवण, यावल, तळोदा व राजूर येथून ३ हजार पेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या क्रीडा स्पर्धेत तालुक्यातील पिंपळे बुद्रुक येथील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आदिवासी आश्रमशाळेच्या खेळाडुंनी उत्तम कामगिरी केली. त्यांची राज्यस्तरावर निवड झाली आहे.

### या खेळाडुंनी मिळविले यश

१९ वर्षा आतील वयोगटात वासुदेव भिमसिंग पावरा याने १०० मीटर धावणे व लांब उडी या खेळ प्रकारात प्रथम क्रमांक पटकाविला. शिवराम इसमल भामरे थाळी फेक- द्वितीय, १७ वर्षा आतील वयोगटात रोशनी लक्ष्मण पावरा थाळी फेक- प्रथम, १४ वर्षा आतील वयोगटात राजकिरण आमाश्या पावरा ४०० मी. धावणे- द्वितीय क्रमांक पटकविला. या सर्व सर्व खेळाडूंची राज्यस्तरावर निवड करण्यात आली. तसेच ४ हजार १०० मी. रिले या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक पटकाविला व मैदानी खेळातील आपला दबदबा कायम राखला. वरील सर्व खेळाडूंना उच्च माध्यमिक विभागाचे उपक्रमशील शिक्षक व मुख्य प्रशिक्षक स्वप्निल पाटील, प्राथमिक शिक्षक दीपक नांद्रे यांचे मार्गदर्शन लाभले. (पान ३ वर)

# अप्पर जिल्हाधिकारी उन्मेष महाजन यांच्या कन्येचे निधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील भूतपुर्व प्रांताधिकारी तथा हल्ली धुळे येथे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी उन्मेष महाजन यांच्या कन्या फाल्गुनी उन्मेष महाजन (वय २७) यांचे गुरुवार, दि. १८ डिसेंबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्या अमेरिकेत जाऊन एमएसची परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाल्या होत्या. फाल्गुनी यांच्या पश्चात आजोबा, आई- वडील व भाऊ असा परिवार आहे. अत्यंत हुशार व हरहुन्नरी असलेल्या फाल्गुनी यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



# केरळच्या तरुणाने सुरू केला ' फ्रेश ' एन ' गुड' स्टार्टअप; १२ रुपयांच्या फणसाला ८०० रुपये दर, आज दीड कोटींची कमाई

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय कृषी क्षेत्रात क्रांती घडविणाऱ्या एका तरुण उद्योजकाने शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत देऊन विशेष फळांचा व्यवसाय सुरू केला. केरळमधील कार्तिक सुरेश यांनी २०२१ मध्ये स्थापन केलेल्या ' फ्रेश ' एन ' गुड ' या स्टार्टअपने मागील आर्थिक वर्षात दीड कोटी रुपयांहून अधिक उलाढाल साधली. मँगोस्टीन, रामबुतान, एवोकॅडो आणि फणसासारख्या दुर्लक्षित फळांना आंतरराष्ट्रीय बाजारात नेले जाणे, कापणीनंतरचे नुकसान कमी करणे आणि ' फार्म-टू-फोर्क ' मॉडेलद्वारे शेतकऱ्यांना न्याय देणे हे या स्टार्टअपचे वैशिष्ट्य आहे.

**स्टार्टअपची सुरूवात : एमएसपीने शेतकऱ्यांना दिला आधार**

कार्तिक सुरेश हे इंजिनिअर आहेत. २०२१ मध्ये त्यांनी केरळ आणि हिमाचल प्रदेशातील शेतकऱ्यांकडून मँगोस्टीन, रामबुतान, एवोकॅडो आणि पॅशन फ्रूटसारख्या विदेशी फळांची सोर्सिंग सुरू केली. पारंपरिक व्यापाऱ्यांच्या एकरकमी कमी किंमत ऑफरमुळे शेतकरी तोट्यात असतात, हे पाहून कार्तिक यांनी एमएसपी-आधारित मॉडेल आणले. यातून शेतकऱ्यांना बाजारभाव कितीही कमी असला तरी निश्चित किमान किंमत मिळते. उदा.-

- रामबुतानसाठी प्रतिकिलो १२५ रुपये एमएसपी.
- ही पारदर्शकता आणि निश्चित खरेदीमुळे २०० हून अधिक शेतकरी जोडले गेले.
- उच्च गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी फळांची निवड (गंध, टेक्स्चर, आकार आणि आवाजाने तपासणी) केली जाते.

या ' फार्मर-फर्स्ट ' दृष्टिकोनामुळे स्टार्टअपला विशेष उत्पादने मिळाली. शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्न मिळाले. आता ही फळे बंगळुरू, मुंबईसह आखाती देश आणि अमेरिकेत निर्यात होतात.

**१२ रुपयांना ८०० रुपये दर**

२०२३ मध्ये कार्तिक यांना फणसाच्या बाजारातील समस्या दिसली. शहरी ग्राहकांना फणस सोलण्याचा त्रास आणि अस्वच्छता यामुळे ते टाळतात, तर शेतकऱ्यांना स्थानिक व्यापारी फक्त २० किलो फणसासाठी १२ रुपये देतात. ही उणीव भरून काढण्यासाठी जानेवारी २०२५ मध्ये त्यांनी सोललेला, खाण्यासाठी तयार (रेडी-टू-ईट) फणसाचे गरे आणले. २०० ग्रॅम पॅकेटमध्ये विविध जाती (जसे- जे३३, व्हिएतनाम सुपर अर्ली, डांग सूर्या) उपलब्ध आहेत.

किंमत : घाऊक १०० रुपये प्रतिपॅकेट.

विक्री वाढ : काही महिन्यांत मासिक विक्री १,००० वरून ३,००० पॅकेटपर्यंत पोहोचली.

शेतकऱ्यांचा फायदा : आता २० किलो फणसासाठी ८०० रुपये मिळतात. ज्यामुळे त्यांचे उत्पन्न ६० पट वाढले.

ही नवकल्पना फणसाला उच्च-मूल्यवर्धित उत्पादन बनविली आणि शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले.

**आव्हाने आणि उपाय**

केरळमधील तीन जिल्ह्यांत खरेदी टीम आणि कलेक्शन सेंटर्सद्वारे काम चालते. मुख्य आव्हान म्हणजे फळांची नाशवंतता (रामबुतान २४ तासांत विकावे लागते).

उपाय :

- प्री-सेल बुकिंगवर अवलंबून.
- ४८ तासांत वितरण (बस, ट्रेन किंवा हवाई मालवाहतुकीने).
- तीन कोल्ड स्टोरेज युनिट्स.



- मागील हंगामात : ८० टन रामबुतान आणि १०० टन फणस विकले.

**दीड कोटींची उलाढाल**

पहिल्या वर्षात १२ लाख रुपयांहून सुरू झालेला व्यवसाय आता दीड कोटीच्या महसुलापर्यंत पोहोचला. यावर्षी विदेशी फळांच्या विक्रीत ५० टक्के वाढ झाली.

भविष्यातील योजना :

- फणसाच्या गऱ्यांचे नमुने दुबई आणि कॅनडामध्ये निर्यात.
- स्वतंत्र निर्यात चॅनेल स्थापन.
- शेतकरी-ग्राहकांमधील पूल मजबूत करणे.

# टीआरपी कमी झाला की पटकन पात्राला मारून टाकतात...!

**मालिकांबाबत प्रसिद्ध अभिनेत्रीचा रोखठोक सवाल**



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : लोकप्रिय बॉलिवूड अभिनेत्रीने आताच्या मालिकांबाबत थेट वक्तव्य केले आहे. आताच्या मालिकांना कथाच नसल्याचे त्या म्हणाल्या.

हिंदी मनोरंजन क्षेत्रात नेहमीच दमदार आणि वास्तववादी भूमिकांमुळे ओळख मिळविणाऱ्या अभिनेत्री शेफाली शाह यांनी छोट्या पडद्याच्या जगावर थेट आणि तिखट टीका केली आहे. भूमिकांमधील बारकावे आणि संवेदनशील अभिनयासाठी प्रसिद्ध असलेल्या या अभिनेत्रीने सध्याच्या मालिकांच्या बदलत्या स्वरूपावर बोट ठेवत ' आज टीव्ही मालिकांची कथाच हरवली आहे,' असे थेट भाष्य केले.

एका मुलाखतीत शेफाली म्हणाल्या, की ' पूर्वी मालिकांना एक ठराविक दिशा असायची. कथा सुरू व्हायची, मध्यभाग गाठायची आणि शेवटाला पोहोचायची. आज मात्र मालिकांना शेवटच उरलेला नाही. ' शेफालींच्या मते, ' टीआरपी कमी पडली की पटकन पात्राला मारून टाका, कथा बदला! रोज नवीन भाग, रोजच्या डेडलाइन्स... हे कोणते कथाकथन?' असे रोखठोक सवाल केला आहे.

शेफाली शाह या बॉलिवूड इंडस्ट्रीतील एक हरहुन्नरी आणि अष्टपैलू अभिनेत्री म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी चित्रपट, टेलिव्हिजन आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवर आपल्या दमदार अभिनयाने एक खास आणि वेगळी ओळख निर्माण केली आहे. २०१९ मध्ये नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या ' दिल्ली क्राईम ' या वेबसीरिजमधील ' डीसीपी वर्तिका चतुर्वेदी ' या भूमिकेमुळे त्यांना खरी ओळख आणि अफाट लोकप्रियता मिळाली. या भूमिकेमुळे त्या एका रात्रीत आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये गणल्या जाऊ लागल्या. ' त्यांनी सत्या ', ' वक्त : द रेस अगेन्स्ट टाईम ', ' दिल धडकने दो ', ' डॉक्टर जी ' या चित्रपटात काम केले आहे.

# भारतीय संघात निवड न झाल्याबद्दल ईशान किशानने मौन सोडले

## सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी जिंकल्यानंतर मांडले ठाम मत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ईशान किशनच्या नेतृत्वाखाली झारखंडने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५ जिंकली आहे. अंतिम सामन्यात झारखंड संघाने हरियाणाला ६९ धावांनी पराभूत केले. झारखंडने प्रथम फलंदाजी करत २६२ धावा केल्या. त्यानंतर हरियाणा फक्त १९३ धावांवर सर्वबाद झाला. त्यानंतर ईशान किशनने भारतीय संघात निवड न झाल्याने मौन सोडले आहे. त्याने त्याचे ठाम मत मांडले आहे.

ईशान किशनने झारखंडसाठी शानदार खेळ केला आणि झारखंडच्या विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावली.

ईशान किशन म्हणाला, की जेव्हा मला भारतीय संघात निवडले गेले नाही तेव्हा मला खूप वाईट वाटले. त्याचे कारण म्हणजे मी चांगली कामगिरी करत होतो. मला वाटले, की जर मला अशा कामगिरीने निवडले गेले नाही, तर कदाचित मला अधिक मेहनत करावी लागेल. मला माझ्या संघाला जिंकण्यास मदत करावी लागेल. कदाचित आपल्याला एक संघ म्हणून खूप चांगले काम करावे लागेल. तरुणांना संदेश देताना ईशान म्हणाला, की निराशा तुम्हाला मागे ठेवेल. म्हणून तुम्ही नेहमीच कठोर परिश्रम करत राहिले पाहिजे. आत्मविश्वास कायम ठेवला पाहिजे. खेळाडूंनी त्यांच्या ध्येयांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. कधीकधी नेहमीच सर्वोत्तम अपेक्षा करतात. मात्र, जेव्हा तुमचे नाव समाविष्ट नसते तेव्हा तुम्हाला वाईट वाटते. आता मी त्या परिस्थितीत नाही. फक्त चांगले प्रदर्शन करत राहणे आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५च्या अंतिम सामन्यात ईशान किशनने दमदार फलंदाजीचे प्रदर्शन केले. त्याने ४९ चेंडूत एकूण १०१ धावा केल्या. ज्यात ६ चौकार आणि १० षटकारांचा समावेश होता. हरियाणाचे गोलंदाज त्याला रोखू शकले नाहीत. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी ईशानला सामनावीर पुरस्कार देण्यात आला.

ईशान किशनची ही खेळी अशा वेळी आली आहे जेव्हा २०२६ च्या टी-२० विश्वचषकासाठी संघ काही दिवसांत जाहीर होणार आहे. त्याने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्येही असाधारण कामगिरी केली. सध्याच्या स्पर्धेत ५१७ धावांसह तो सर्वाधिक धावा करणारा खेळाडू होता. निवडकर्ते त्याची निवड करतात की नाही हे पाहणे बाकी आहे.



# थंडीसाठी शक्तीवर्धक आणि औषधी कुळीथाचे माडगे-सूप!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कुळीथाचे माडगे हा एक पारंपरिक महाराष्ट्रीयन पदार्थ आहे. जो कुळीथ (हुलगे) नावाच्या डाळीपासून बनतो. हा शरीरात उष्णता निर्माण करून आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरतो.

**साहित्य :**

कुळीथ आणि तांदळाची जाडसर भरडी (किंवा कुळीथ पीठ) १ वाटी, तूप २ चमचे, ठेचलेला लसूण ५-६ पाकळ्या, हिरवी मिरची २ (उभी चिरलेली), जिरे, हिंग, हळद, मीठ, कोथिंबीर आवश्यकतेनुसार.

**कृती (पौष्टिक माडगे) :**

**भरडी :** कुळीथ भाजून आणि तांदळासोबत जाडसर दळून भरडी तयार करून घ्या.

**फोडणी :** कढईत तूप गरम करून त्यात जिरे, हिंग, ठेचलेला लसूण आणि हिरवी मिरची घालून परतून घ्या.

**मिक्स करा :** भरडीमध्ये थोडे पाणी घालून गुठळ्या नसलेले मिश्रण तयार करा.

**किडनी स्टोन, कंबरदुखी आणि थंडीवर रामबाण उपाय असलेला पारंपरिक पदार्थ!**



**शिजवा :** कढईत पाणी (साधारण ४-५ कप) उकळून घ्या. उकळी आल्यावर तयार केलेले भरडीचे मिश्रण हळूहळू सोडा आणि सतत ढवळत राहा.

**मंद आच :** मंद आचेवर १५-२० मिनिटे शिजवा. जेणेकरून कुळीथ चांगले शिजेल. मीठ घाला.

**सर्व्ह करा :** गरमागरम माडग्यावर तूप आणि कोथिंबीर घालून सूपप्रमाणे प्या.

**' गुपित ' टिप्स :**

**पौष्टिक :** माडगे शिजविताना गुठळ्या होऊ नयेत म्हणून गरम पाण्यात हळूहळू मिश्रण सोडावे आणि सतत ढवळावे.

**आरोग्य :** माडगे नेहमी गरम आणि तुपासोबत खाल्ल्यास ते जास्त शक्तीवर्धक ठरते.

# फक्त ५ सेकंद हमिंग करा; नैसर्गिक रेणूचे प्रमाण वाढवा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अलीकडच्या एका संशोधनात वैज्ञानिकांनी एक आश्चर्यकारक गोष्ट उघड केली आहे. ती म्हणजे फक्त 5 सेकंद हमिंग केल्यास शरीरातील नायट्रिक ऑक्साईड या नैसर्गिक रेणूचे प्रमाण तब्बल १४०० टक्क्यांनी वाढते. हा छोटासा रेणू आपल्या शरीरासाठी ' मिरॅकल मोलेक्यूल ' समजला जातो. कारण तो रक्तवाहिन्या विस्तारतो. ऑक्सिजन सर्क्युलेशन सुधारतो आणि ब्रेन व हर्ट फक्शन सशक्त ठेवतो. म्हणजेच फक्त हमिंग करून आपण आपल्या शरीराला ऑक्सिजन-रीच, अलर्ट आणि एनर्जेटिक बनवू शकतो.

**नायट्रिक ऑक्साईड म्हणजे काय?**

नायट्रिक ऑक्साईड हा शरीरात नैसर्गिकरीत्या तयार होणारा वायू आहे जो रक्तवाहिन्या सैल करून रक्तप्रवाह सुधारतो. मेंदूला ऑक्सिजन पोहोचवतो. immune system मजबूत करतो आणि मूड सुधारतो. कारण तो serotonin release वाढवतो. जेव्हा आपण हमिंग करतो तेव्हा आपल्या sinus cavities मध्ये निर्माण होणाऱ्या व्हायब्रेशन्समुळे नो प्रॉडक्शन प्रचंड वाढते. हे व्हायब्रेशन्स आपल्या नसल पॅसेजेसमध्ये हळूवारपणे प्रतिध्वनी करतात आणि शरीरात ऑक्सिजनचे प्रमाण झपाट्याने वाढते. भारतीय योगशास्त्रात हमिंगसारखीच एक प्राचीन प्राणायाम पद्धत आहे. Bhramari Pranayama ज्याला ' Bee Breath ' म्हणतात. योगातील Bhramari Pranayama : हजारो वर्षांपूर्वीचा वैज्ञानिक चमत्कार आहे. ' Bhramara ' म्हणजे मधमाशी. या प्राणायामात आपण मधमाशीच्या गुणगुणण्यासारखा ' Mmmmm ' आवाज निर्माण करतो.



योगशास्त्र सांगते, की ' जेव्हा मधमाशीप्रमाणे अंतर्मनात ध्वनी निर्माण होतो तेव्हा मन शांत होते आणि विचार स्वच्छ होतात.' आज मॉडर्न न्यूरोसायन्स सांगते, की या ध्वनीमुळे Vagus nerve सक्रिय होते. जी हृदयगती आणि तणाव नियंत्रित करते. Parasympathetic nervous system मजबूत होते. त्यामुळे शरीर शांत होते. Serotonin आणि नायट्रिक ऑक्साईड दोन्ही वाढतात. ज्यामुळे relaxed alertness म्हणजेच शांत. पण जागृत अवस्था निर्माण होते.

**ओंकार साधना आणि साऊंड फ्रिक्वेन्सी**

जेव्हा आपण ओम उच्चारतो, त्याचा शेवटचा भाग ' Mmmm' हाच हमिंगचा स्वर आहे. हा ध्वनी मेंदूच्या केंद्रात आणि sinuses, pineal gland, pituitary gland मध्ये कंप निर्माण करतो. संशोधन सांगते, की ओम चँटिंग केल्याने अनझायटी कमी होते. हर्ट रेट व्हॅरिबिलीटी सुधारते (जे मन-शरीर समतोलाचे लक्षण आहे.) नायट्रिक ऑक्साईड फ्लो वाढतो आणि रक्तदाब नियंत्रित राहतो. ' एम्स' च्या संशोधनानुसार नियमित ओम चँटिंग केल्याने स्लीप क्वालिटी, लंग फक्शन आणि मेंटल फोकस सुधारतो. म्हणजेच ओम हा नुसता अध्यात्मिक ध्वनी नाही, तर शरीरासाठी नैसर्गिक नायट्रिक ऑक्साईड थेरपी आहे.

**दररोज हमिंग कसे करावे?**

१) शांत ठिकाणी बसा, पाठीचा कणा सरळ ठेवा.
२) नाकाद्वारे हळूवार श्वास घ्या.
३) ओठ मिटून, श्वास सोडताना ' Mmmmm' असा हमिंग करा.
४) तो ध्वनी चेहरा, डोके आणि छातीत कंपन निर्माण करत आहे हे अनुभवा.
५) सुरूवातीला ५-७ वेळा करा. हळूहळू वेळ वाढवा.

भ्रामरी प्राणायाम करताना अंगठ्यांनी कान बंद करा. बोटे हलके कपाळावर ठेवा. श्वास घ्या, आणि श्वास सोडताना ' Mmmmm ' असा मधमाशीचा ध्वनी करा. मनात एकाग्रता ठेवा आणि ध्वनीचा नाद अंतर्मनात ऐका. प्राचीन ज्ञान आणि आधुनिक विज्ञान एकच सांगतेय.

योगात म्हटले आहे, की ' नाद ब्रह्म ' संपूर्ण विश्व ध्वनीतूनच निर्माण झाले आहे. आज विज्ञानही सांगते, की व्हायब्रेशन, फ्रिक्वेन्सी आणि रिसोनन्स हे शरीरातील ऊर्जा प्रवाहाचे मूलभूत नियम आहेत. म्हणूनच जेव्हा आपण हमिंग, भ्रामरी किंवा ओमचा नाद करतो तेव्हा आपण स्वतःला पुन्हा नॅचरल हार्मोनीमध्ये आणतो. शरीर, मन आणि श्वास यांचा सुंदर संतुलन. आपल्या आरोग्यासाठी अनेक महागड्या औषधे किंवा सप्लिमेंट्सची गरज नाही. आपल्या स्वतःच्या श्वासाचा आवाज हा सर्वांत मोठा उपचार आहे. दररोज काही मिनिटे हमिंग करा. म्हणजे तणाव कमी होईल, मन शांत होईल आणि शरीरात नवीन ऊर्जा निर्माण होईल.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## पिकअपला धडक, दुचाकीस्वार जखमी

ग्लोबल महातेज वत्तसेवा

अमळनेर : येथील पैलाड परिसरात उभ्या असलेल्या महिंद्रा पिकअपला दुचाकीने मागून धडक दिली. यात दुचाकीस्वार जखमी झाला आहे. ही घटना शुक्रवार दि. १९ डिसेंबर रोजी सायंकाळी चारच्या सुमारास घडली. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेतली. जखमीला रस्त्याच्या कडेला नेले. मोबाईलद्वारे नातेवाईकांशी संपर्क साधण्यात आला. त्यानंतर जखमीला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, संबंधित दुचाकीस्वार मद्यधुंद अवस्थेत असल्याची चर्चा होती. धुळे जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे. अपघातामुळे काही वेळ वाहतूक खोळंबली होती.

## रेल्वे प्रवासाचे नियम बदलले

# फक्त मोबाईलवर तिकिटे दाखविणे पुरेसे नाही

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : रेल्वेने प्रवाशांसाठी नवीन तिकिट नियम लागू केला आहे. प्रवास करताना थेट तिकीट असणे अनिवार्य आहे. ऑनलाइन तिकिटे पाहणे स्वीकार्य राहणार नाही. हे सर्व विभागांना लागू आहे.

नवीन नियमांनुसार, यूटीएस, एटीव्हीएम किंवा काउंटरद्वारे खरेदी केलेली अनारक्षित तिकिटे केवळ मोबाईल स्क्रीनवर पाहिल्यावरच वैध राहणार नाहीत. प्रवाशांना तिकिटाची हार्ड कॉपी बाळगावी लागेल. तथापि, ई-तिकिटे आणि एम-तिकिटे नवीन नियमांमधून वगळण्यात आली आहे. बनावट तिकिटे आणि फसवणूक पूर्णपणे रोखण्यासाठी आणि सुरक्षित आणि पारदर्शक प्रवास सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले आहे. सद्यस्थितीत आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) चा वापर वेगाने वाढत आहे. एआय काम सोपे झाले असले, तरी त्याचा गैरवापरही वाढत आहे. एआयचा वापर करून बनावट तिकिटे तयार केल्याचे एक गंभीर प्रकरण रेल्वेमध्ये उघडकीस आले आहे. या घटनेनंतर रेल्वेच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. तपास कडक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रेल्वे अशा डिजिटल बाबींना हलके घेऊ इच्छित नाही.

जयपूर मार्गावरही अशीच एक घटना घडली होती. चाचणी दरम्यान काही विद्यार्थी त्यांच्या मोबाईलवर दाखविलेल्या तिकिटांचा वापर करून प्रवास करत होते. तिकिटे पूर्णपणे खरी असल्याचे दिसून आले. क्यूआर कोड, प्रवासाची माहिती आणि भाडे तपशील सर्व बरोबर असल्याचे दिसून आले. तथापि, टीसीने तिकिटाची कसून तपासणी केली तेव्हा सत्य बाहेर आले. विद्यार्थ्यांनी एआय टूल्स वापरून एकच अनारक्षित तिकीट एडिट केले असते आणि ७ जणांनी एकाच तिकिटावर प्रवास केला असता. या घटनेनंतर रेल्वेने सर्व विभागांना अलर्ट जारी केला आहे. टीटीई आणि टीसीच्या मोबाईल आणि टॅब्लेटवर एक विशेष टीटीई ॲप स्थापित केले आहे. ज्यांना शंका असेल ते क्यूआर कोड स्कॅन करतील. यूटीएस नंबर आणि रंग कोड तपासतील. यामुळे तिकीट वैध आहे की नाही ? हे लगेच कळेल. रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की, अनारक्षित तिकिटाची प्रत्यक्ष प्रत बाळगणे अनिवार्य आहे. भविष्यात होणारी फसवणूक रोखण्यासाठी तिकीट दलालांना लक्ष्य करण्यात आले आहे.



पान १ वरून

## पिंपळे बुद्रुक आश्रमशाळेतील खेळांडुची राज्यस्तरावर निवड

आदिवासी विकास विभाग, नाशिक येथील अप्पर आयुक्त दिनकर पावरा, उपायुक्त अरुणकुमार जाधव, सहायक आयुक्त नीलेश अहिरे, विद्यापीठाचे उपकुलसचिव वसंत वळवी, धुळे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, नंदुरबार प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार, यावल प्रकल्प अधिकारी अरुणजी पवार आदींसह विद्यार्थ्यांना मेडल व ट्रॉफी देण्यात आली.

खेळाडूंच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विद्याताई पाटील, संस्थेचे सचिव व शैक्षणिक सल्लागार युवराज पाटील, यावल प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी, अरुण पवार, सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रशांत माहुरे, पवन पाटील, संदीप पाटील, जावेद तडवी, श्रीमती मिनाक्षी सुलताने, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी विश्वास गायकवाड, मुख्याध्यापक अविनाश अहिरे, उदय पाटील आदींनी गौरव केला.

# अमळनेर तालुक्यातून दहा दिवसात तीन अल्पवयी मुली, एक तरूणी बेपत्ता

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शहरासह तालुक्यातून तरुणी आणि महिला बेपत्ता होण्याचे प्रमाण हल्ली वाढले आहे. गेल्या दहा दिवसात विविध भागातून चार तरुणी व एक विवाहिता बेपत्ता झाल्याची नोंद पोलिसात करण्यात आली आहे. यात एका अल्पवयीन मुलीचाही समावेश आहे. पालकांमध्ये चिंता वाढली असून, पोलिसांनी शोध घ्यावा अशी मागणी होत आहे. शहरातील ढेकू सीम रोडवरील




अल्पवयीन मुलगी शुक्रवार, दि. १२ डिसेंबर रोजी पहाटे पाचच्या सुमारास बेपत्ता झाली आहे. याबाबत येथील पोलीस ठाण्यात हरविल्याची नोंद झाली आहे. हवालदार विनोद भोई तपास करीत आहेत. दुसऱ्या घटनेत शहरातील १९ वर्षांची युवती शनिवार दि. १३ डिसेंबर रोजी सकाळी कोणालाही न सांगता घरातून निघून गेली. याबाबत तिच्या वडिलांनी दिलेल्या माहितीवरून पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे. शहरातील एका शाळेतील २२ वर्षीय तरुणी बेपत्ता झाली आहे. तिसऱ्या घटनेत तालुक्यातील कळंबु येथे शेतात कामासाठी गेलेली अल्पवयीन मुलगी मंगळवार, दि. १६ डिसेंबर रोजी सकाळी कापूस वेचण्यासाठी शेतात गेली होती. दुपारी ती बकऱ्या चारण्यासाठी शेतातच थांबली होती. नंतर ती घरी न परतल्याने शेतात शोध घेतला असता तरुणी आढळून आली नाही. घटनास्थळी तिची चप्पल सापडली आहे. गावात व परिसरातील शेतात शोध घेऊनही ती सापडलेली नाही. याप्रकरणी त्यामुळे मारवड पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाने फुस लावून पळून नेल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. हवालदार सुनील पाटील तपास करीत आहेत.

## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# बारावी इंग्रजी विषयावर आज नि:शुल्क ऑनलाइन व्याख्यान

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : महाराष्ट्र प्रोफेशनल टीचर्स असोसिएशनतर्फे (पीटीए) बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी पेपरसाठी 'परीक्षेला जाता जाता' यशवंत पीटीआय व्याख्यानमाला आयोजीत करण्यात आली आहे. जळगाव जिल्ह्यातुन याची सुरूवात होत असून, शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून ते दुपारी १२ वाजेपर्यंत ऑनलाईन (यू ट्युब लाईव्ह लेक्चर) व्याख्यान आयोजीत करण्यात आले आहे.

जळगाव येथील श्रीनिवास इंग्लिश अकॅडमीचे व्यंकटेश राजन अय्यंगार प्रमुख मार्गदर्शक असतील. पीटीएचे राज्याध्यक्ष प्रशांत कासार, महासचिव मोहन गावडे, जळगावचे अध्यक्ष सुरेश राजपूत, उपाध्यक्ष हर्षल ठाकूर व राज्य कोअर टीम व क्लासचे संचालक उपस्थित राहतील. या व्याख्यानात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अवघ्या दोन तासात इंग्रजी विषयाची संपूर्ण, नेमकी व परीक्षाभिमुख उजळणी होईल. परीक्षेच्या अंतिम टप्प्यातील विद्यार्थ्यांसाठी हे व्याख्यान उपयुक्त ठरणार आहे. अमळनेर शहर तालुक्यातील विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी ॲड. भय्यासाहेब पगर (9423904483) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**विद्यार्थ्यांसाठी लिंक:** https://youtube.com/@saienglishacademymagarsir?si=ZpNalsYunW26clrD

# अमळनेर येथे सोमवारी 'ग्रंथ : चिंतनचर्चा' उपक्रम

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : महाराष्ट्र साहित्य परिषद (शाखा अमळनेर) व प्रताप महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे 'ग्रंथ : चिंतनचर्चा' हा साहित्यिक उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. सोमवार, दि. २२ डिसेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजता प्रताप महाविद्यालयातील पू. साने गुरुजी सभागृहात हा उपक्रम होईल.

या कार्यक्रमांतर्गत मराठीतील प्रसिद्ध समीक्षक डॉ. भरतसिंह पाटील लिखित 'पाण्याच्या तळ्यांची शोधयात्रा' (आधिवैचारिक अन्वयार्थ) व जी. ए. अंचलकर यांचे 'अज्ञाताचे यांत्रिक' (आधिवैचारिक शोध) या दोन समीक्षा ग्रंथांवर सखोल चिंतनचर्चा होणार आहे. या कार्यक्रमात वक्ते म्हणून प्रा. नितीन पाटील (इंग्रजी विभाग) व डॉ. रमेश माने (मराठी विभाग) सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अमळनेरचे अध्यक्ष संदीप घोरपडे अध्यक्षस्थानी असतील. प्राचार्य डॉ. एल. डी. जाधव व कवी, चित्रकार व समीक्षक डॉ. भरतसिंह पाटील उपस्थित प्रमुख पाहुणे असतील. या कार्यक्रमास रसिक, विद्यार्थी, प्राध्यापक व साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## भारतातच जागतिक विद्यापीठाचे वर्ग भरणार

ग्लोबल महातेज वत्तसेवा


अमळनेर : देशातील मुंबई, बंगळूर, दिल्ली आदी शहरात येऊ घातलेल्या परदेशातील विविध नामांकित विद्यापीठांच्या संकुलांमुळे २०४० पर्यंत या विद्यापिठांमध्ये देशातील ५ लाख ६० हजाराहून अधिक विद्यार्थी या विद्यापीठांच्या संकुलात शिक्षण घेऊ शकतील. त्यामुळे उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेसोबतच देशातला ११३ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या परकीय चलनाची बचत होईल, असा दावा डेलॉईट इंडिया आणि नाईट फ्रँक इंडिया यांनी केला आहे. त्यांच्या अहवालात भारतातील ४० शहरांचे मुल्यांकन करण्यात आले.

# विजयनाना पाटील आर्मी स्कूलच्या दोन खेळाडूंची राज्यस्तरावर निवड!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील विजयनाना पाटील आर्मी स्कूल अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेजचा बारावीचा विद्यार्थी रोहन बाविस्कर याने १९ वर्ष वयोगटातील ५५ किलो गटात विभागस्तरीय बेल्ट रेसलिंग या नवीन क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तर अकरावीचा विद्यार्थी शैलेश माळी याने १९ वर्ष वयोगटातील ६० किलो गटात विभागस्तरीय बेल्ट रेसलिंग या नवीन क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्यांची अहिल्यानगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यशस्वी खेळाडूंचे नवलभाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील, संस्थेच्या मार्गदर्शिका शीलाताई पाटील, कार्याध्यक्ष अनिकेत विजय पाटील, नवलभाऊ प्रतिष्ठानचे प्रशासकीय अधिकारी डी. बी. पाटील, प्रा. श्याम पवार, संस्थेचे मानद शिक्षण संचालक प्रा. सुनील गरुड, प्राचार्य बी. डी. पाटील यांनी अभिनंदन केले आहे. क्रीडाशिक्षक आर. ए. घुगे यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान, या दोन्ही यशस्वी खेळाडूंचे गुरुवार, दि. १८ डिसेंबर रोजी प्राचार्य बी. डी. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जेष्ठ शिक्षक एस. ए. बाविस्कर, सुभेदार मेजर श्रीराम पाटील, आर. ए. घुगे, प्रेमराज सूर्यवंशी व उमेश काटे उपस्थित होते.



ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!

| जाहिरात दर | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# पौष अमावास्येला पूर्वजांसाठी करा तर्पण; दूर होईल पितृ दोष आणि मिळेल मोक्ष!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पौष महिन्यातील अमावास्येला पौष अमावास्या म्हणतात. ही अमावास्या १९ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे सुमारे ०४ : ५९ वाजता सुरू होऊन २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी सुमारे ०७ : १२ वाजता संपते. तिथी सूर्यास्ताच्या आधी सुरू झाल्यामुळे सर्व धार्मिक कर्मकांड आणि पूजा-अर्चा १९ डिसेंबर (शुक्रवार) रोजी करायला हवेत. हिंदू पंचांगानुसार ही या वर्षातील शेवटची अमावास्या असून, दैनंदिन जीवन व आध्यात्मिक शुद्धतेसाठी विशेष महत्त्वाची मानली जाते.

### अमावास्येची परंपरा

अमावास्या म्हणजे चंद्र देवतेचा पूर्णतः अदृश्य दिवस. असे दिवस हिंदू धर्मात पितृशांती देखील मानले गेले आहेत. कारण त्या दिवशी पूर्वजांचे अतिप्रकाशमान स्वरूप पृथ्वीवर येते, अशी श्रद्धा आहे.

### पितृ पूजा व पितृदोष निवारण

पौष अमावास्या विशेषतः पितृपूजनासाठी सर्वोत्तम मानली जाते. या दिवशी पिंडदान, तर्पण, श्राद्ध यामुळे मानले जाते, की मृतात्म्यांना तृप्ती मिळते. कुटुंबातील पितृदोष शांत होतो. याचबरोबर या दिवशी केलेली पूजा, तर्पण आणि दान कर्म अनंत पुण्यदायी मानले जाते.

### आध्यात्मिक आणि नकारात्मक ऊर्जा समाप्ती

अमावास्येचा अंधकार ही प्रतिकात्मकता नव्याने आरंभ, ऋणमुक्ती, मानसिक शांती आणि आत्मशोधाचा संदेश देते. पितृकर्म आणि दानादिकारे केल्याने अशुभ परिणाम आणि नकारात्मक ऊर्जा कमी होते, अशी समज आहे.

### पूजा-विधी व शुभ कार्य

**स्नान आणि सूर्यपूजा :** पौष अमावास्येच्या दिवशी प्रातःकाळ



स्नान करणे अत्यंत शुभ मानले जाते. स्नानानंतर सूर्यदेवतेला अर्घ्य देणे आणि दिवा प्रज्वलित करणे शुभफलदायी आहे.

**पितृकार्य (तर्पण, पिंडदान) :** पूर्वजांच्या समाधी, नदीकाठी किंवा पवित्र ठिकाणी तर्पण करणे ही एक महत्त्वाची परंपरा आहे. या कर्माने पितृदोष शांत होतो. कुटुंबात सुख-समृद्धी येते, अशी श्रद्धा आहे.

**दान आणि परोपकार :** अन्नदान, वस्त्रदान, धान्यदान हे पुण्याचे काम अमावास्येच्या दिवशी केल्यास ते अनंतगुण्यदायी मानले जाते. लोकांना खीर, गव्हाचे पीठ, लहान मुलांना वस्त्रे किंवा गरिबांना अन्न देण्याची आज्ञा दिली जाते.

**मंत्रोच्चार आणि ध्यान :** आध्यात्मिक साधना, मंत्रोच्चार (जसे ॐ पितृदेवाय नमः), आणि श्वास-ध्यान करणे, मानसिक शांती व पारिवारिक सौहार्द वाढवते, अशी परंपरा आहे.

### उपाय आणि सांस्कृतिक समज

**परिवारिक समाधानासाठी उपाय :** अमावास्येच्या दिवशी कुटुंबात सहमती, दान, सेवा, माधुर्य आणि एकत्रित पूजा केल्याने संबंध दृढ होतात. घरातील वाद कमी होतात, असे अनेक शास्त्रीय ग्रंथ सांगतात.

### विशेष भोग आणि प्रसाद

या दिवशीही विशेष खीर, प्रसाद किंवा सात्त्विक भोजन तयार करून ब्राह्मण, गरीब यांना दानासह गायीला खाऊ घातल्यास पुण्यप्राप्ती होत असल्याची समज आहे.

### तर्पण करण्याची योग्य पद्धत

- अमावास्येच्या दिवशी सकाळी लवकर उठून पवित्र नदीत स्नान करावे.
- शक्य असल्यास घरी गंगाजल पाण्यात मिसळून स्नान करावे.
- आंघोळ केल्यानंतर पांढरे किंवा हलके पिवळे कपडे घालावे.
- तर्पण नेहमी दक्षिण दिशेला तोंड करून करावे. कारण दक्षिण दिशा यम आणि पूर्वजांची मानली जाते.
- आसनावर बसावे.
- तांब्याच्या भांड्यात शुद्ध पाणी घ्यावे.
- त्यात काळे तीळ, थोडे कच्चे दूध आणि बार्ली घालावे.
- तुमच्या उजव्या तर्जनी आणि अंगठ्याच्या मध्ये जमिनीवर हळूहळू पाणी ओतावे. पाणी अर्पण करताना तुमच्या कुळाचे नाव आणि पूर्वजांचे नाव घ्यावे.
- तर्पण दरम्यान **ओम पितृगणाय विद्महे जगत् धारिन्ये धीमहि तन्नो पितृः प्रचोदयात किंवा ओम नमो भगवते वासुदेवाय** या मंत्राचा जप करावा.
- शेवटी जाणूनबुजून किंवा अजाणतेपणे झालेल्या कोणत्याही चुकीबद्दल माफी मागावी.

### समाज आणि लोकजीवनातील स्थान

पौष अमावास्या गावांमध्ये आणि शहरी भागातही लोकप्रिय आहे. लोक ही तिथी पितृपूजन, स्नान, दान, आणि शांत मनाने ध्यानधारणा यासाठी वापरतात. यावर्षी (२०१५ ते २०२५ कॅलेंडरमध्ये) ही वर्षाची अंतिम अमावास्या असल्याने अधिकाधिक लोक या दिवशी शुचिता, सांस्कृतिक परंपरा आणि पारिवारिक एकता यावर अधिक भर देतील.

## हे व्रत केल्याने गणपती बाप्पा पूर्ण करतात मनातील इच्छा

### विनायक चतुर्थी

हिंदू पंचांगानुसार, प्रत्येक महिन्यातील शक्ल पक्षातील चतुर्थी तिथीला भगवान श्री गणेशांना प्रसन्न करण्यासाठी विनायकी चर्तुर्थीचे व्रत केले जाते. मार्गशीर्ष मासातील चतुर्थी तिथीला श्री गणेश पूजेचे विशेष महत्त्व आहे. या दिवशी श्रीगणेशाची विशेष पूजा केल्यास व्यक्तीच्या सर्व इच्छा पूर्ण होऊ शकतात. जीवनात उष्ण प्राप्त होते.

- सकाळी लवकर उठून अंघोळ करुन घ्या. तुमच्या इच्छेनुसार सोने, चांदी, तांबे, पीतळ किंवा मातीच्या मूर्तीची स्थापना करा.
- त्यानंतर श्रीगणेशाची पूजा करावी. श्रीगणेशाना लाल फुल, गुलाल अर्पण करावा. गणेश मंत्र (ऊं गं गणपतयै नमः) चा उच्चार करत २१ दुर्वा अर्पण करा.
- श्रीगणेशाला २१ लाडू किंवा मोदकाचा नैवेद्य दाखववावा. यामध्ये ५ मोदक मूर्तीजवळ ठेवावेत आणि पाच ब्राह्मणांना दान करावेत. इतर मोदक प्रसाद स्वरूपात इतरांना वाटून टाकावेत.
- पूजेमध्ये गणपती स्त्रोत, अथर्वशीर्ष, संकटनाशक स्त्रोत आदिचा पाठ करा.
- ब्राह्मणांना जेवू घालून दक्षिणा द्यावी. संध्याकाळी स्वतः जेवण करावे. शक्य असल्यास उपवास करावा.

### विनायक चतुर्थीचे महत्त्व


विनायक चतुर्थीला वरद विनायक चतुर्थी असेही म्हटले जाते. देवाकडून आपली कोणतीही इच्छापूर्तीच्या आशिर्वादाला वरद म्हणतात. जे भक्त विनायक चतुर्थीचा उपवास करतात त्यांना श्रीगणेश ज्ञान आणि धैर्याचा आशीर्वाद देतात. ज्या मनुष्याकडे हे गुण असतात तो जीवनात खूप प्रगती करतो आणि त्याला मनासारखे फळंही प्राप्त होते.

# श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज दैनंदिन प्रवचन सेवा!

## काळजी करायची तर नामाची करा

आपण असे पाहतो की आज जे दुःखाचे वाटते तेच पुढे सुखाचे होते. जे सुखाचे आहे असे वाटते तेच पुढे दुः खाला कारणीभूत होते. तुम्हांला जे सुखदुःख येते ते भगवंतापासून येते म्हटले, तर दुःखाचे कारण काय ? जोपर्यंत परक्याने दिलेले दुःख भगवंतानेच दिले असे वाटत नाही, तोपर्यंत आपण भगवंताचे झालो नाही. आपण घाबरतो केव्हा, तर आपला आधार सुटला म्हणजे, जे जे होते ते रामाच्या इच्छेने होते असे समजावे. संकटे देवाने आणली तर ती सोसण्याची शक्तीही तोच देतो.

समर्थांचे होऊन असे भ्यावे का ? समर्थांचे जे झाले त्यांनी परिस्थितीला नाही डगमगू. प्रत्यक्ष संकटाचे निवारण जर करता येते, तर मग भिती कशाची धरावी ? मुळात जी भिती नाही ती तुम्ही मनाने निर्माण करता याला काय म्हणावे ? खेळातली सोंगटी मेली म्हणजे त्याचे सुख-दुःख कोणी करतो का ? तसे



व्यवहारात आपण वागावे. सुखाने हुरळून जाऊ नये आणि दुःखाने अस्वस्थ होऊ नये. असे व्हायला आपले मन शांत राहणे जरूर असते. जोपर्यंत 'मी कर्ता आहे' अशी भावना असते, तोपर्यंत सुखदुःखाचे हेलकावे मनाला बसतात. म्हणून कर्तेपण रामाकडे द्यावे, आणि देहाने कर्तव्यात राहून मन शांत ठेवावे. 'परिस्थितीचा परिणाम माझ्या मनावर घडू देऊ नको देवा' असे म्हणावे, 'परिस्थितीच बदल' असे देवाला म्हणू नये.

ज्याप्रमाणे एखादे विष रक्तात मिसळावे, त्याप्रमाणे काळजी आपल्या अंगात भिनली आहे. त्याला वरून औषध लावले तर उपयोग होत नाही. यासाठी भगवंताच्या अनुसंधानाचे इंजेक्शनच पाहिजे. जे दुर्गुण भगवंताचा विसर पाडायला कारण होतात, त्या सर्वांचा संग्रह म्हणजे काळजी होय. काळजी हा फार मोठा रोग आहे. पोटात रोग वाढला आणि त्यानेच पोट भरले की रोग्याला अन्न जात नाही. त्याचप्रमाणे, ज्याला काळजी फार, त्याच्या हृदयात आनंद जाऊच शकत नाही. या काळजीचे आईबाप तरी कोण ? देहबुद्धीमुळे आपल्याला काळजी लागते. देहबुद्धी म्हणजे वासना. वासना आणि अहंकार हे काळजीचे आईबाप आहेत. अशा और स्वभावाचे आई- बाप असल्यावर पोर असे विचित्र असायचेच ! भगवंताचे स्मरण करीत गेल्याने आईचा आणि मुलीचा मृत्यू बरोबर घडून येतो. वासना आणि काळजी दोघी जणी एकदम मरतात. खरे म्हणजे, एकच स्थिती कधी कायम राहात नाही म्हणून आपल्याला भिती वाटते आणि तिच्यातून काळजी उत्पन्न होते. काळजी जितकी आपल्याला मारते, तितकेच नाम आपल्याला तारते. तरीसुद्धा आपण काळजीलाच पकडून बसतो, याला काय म्हणावे ? आपला जेवढा वेळ काळजीत गेला तेवढा वाया गेला असे समजावे. काळजी करायचीच असेल तर अनुसंधान कसे टिकेल याची करा. नामाची काळजी घ्या, म्हणजे काळजी करायची वेळच येणार नाही.

# हनुमान जी को कैसे प्रसन्न करें? जानिए प्रेमानंद महाराज का जवाब

संक्षेपः हनुमान जी कलियुग के देवता (जागृत देवता) माने जाते हैं। इन्हें कई नामों से जाना जाता है। यही वजह है कि बजरंगबली को प्रसन्न करने के लिए लोग तरह-तरह के उपाय करते हैं। ऐसे में मथुरा-वृंदावन के फेमस संत प्रेमानंद महाराज ने हनुमान जी को प्रसन्न करने के लिए कुछ सरल तरीके बताए ।

मथुरा-वृंदावन के प्रसिद्ध संत प्रेमानंद महाराज किसी परिचय के मोहताज नहीं है। उनके दर्शन के लिए लोग दूर-दूर से आते हैं। यहां तक कई फेमस सेलिब्रिटी, नेता भी इनके दरबार में नतमस्तक होते हैं। लोग ना सिर्फ प्रेमानंद महाराज के दर्शन के लिए आते हैं, बल्कि लोग जीवन, धर्म से जुड़े सवाल भी पूछते हैं।

सवाल-जवाब वाले प्रेमानंद महाराज के वीडियोज सोशल मीडिया प्लेटफॉर्म पर भी खूब वायरल होते हैं।

### प्रेमानंद महाराज जी से सवाल

ऐसे ही एक महिला भक्त ने प्रेमानंद महाराज से पूछा कि मैं भगवान हनुमान को बहुत मानती हूं और उनमें श्रद्धा भी रखती हूं। लेकिन उन्हें प्रसन्न करने का सही तरीका समझ में नहीं आता है। उनके किस नाम का जाप करूं। चलिए प्रेमानंद महाराज का जवाब जानते हैं।

### हनुमान जी को क्या पसंद है?

इस सवाल का जवाब देते हुए प्रेमानंद महाराज जी कहते हैं कि रामचरित सुनबे को रसिया, राम लखन सीता मन बसिया। वो आगे कहते हैं कि हनुमान जी को प्रसन्न करने के लिए हमें यह समझना होगा कि उन्हें पसंद क्या है? जैसे हम किसी को प्रेम करते हैं, तो उसकी पसंद देखते हैं। हनुमान जी को सियाराम जी का चरित्र पसंद है।

महाराज जी ने कहा कि ऐसे में आप हनुमान जी को रामचरित मानस सुनाइए और सीता-राम, सीता-राम का नाम जप सुनाइए। वो कहते हैं कि



**यत्र यत्र रघुनाथ कीर्तनं**
**तत्र तत्र कृतमस्तकंजलम् ,**
**बाष्पवारीपरिपूर्णालोचनं**
**मारुतिं नमत राक्षसान्तकम् ॥**

इसका अर्थ बताते हुए महाराज जी कहते हैं कि हनुमान जी महाराज जहां सियाराम का कीर्तन होता है, आंसू बहाते हुए वहां विराजमान रहते हैं। ऐसे हनुमान जी को प्रसन्न करने के लिए हमें चाहिए, रामचरित मानस सुनाएं और सीता राम नाम का जप करें। इससे हनुमान जी बहुत जल्दी प्रसन्न होते हैं।

# भीमसेन आयुर्वेदिक कापूर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हा कापूर कुठल्याही विशिष्ट आकारात येत नाही, स्फटिकासारखा येतो. याचे गोल, चौकोनी वडीत रूपांतर करता येत नाही. कारण नेहमीच्या कापराप्रमाणे यात मेण नसते. सर्दी, खोकल्याकरिता एका पातेल्यात गरम पाणी करून त्यामध्ये हा कापूर चुरडून टाकावा व वाफारे घ्यावेत.

१) नाकाला, कपाळाला, छातीलाही कापूर लावावा. लहान मुलांनाही लावला तरी चालेल.

२) रुमालावर कापूर चुरडून तो हुंगावा किंवा एखाद्या लहानशा डबीत घेऊन सोबत ठेवावा. व्हीक्सची सवय टाळा.

३) पर्यटनावेळी बर्फाळ स्थानात श्वास लागत असल्यास तो हुंगावा.

४) तीळाच्या तेलातून तो सांध्यांना लावावा. तीळाच्या तेलाचा वास उग्र असल्यामुळे हे कापूरमिश्रीत तेल लावल्यावर कपड्यांना वास येतो. त्यामुळे त्याची योग्यतोपरी काळजी घ्यावी.

५) कोंड्याकरिता, सतत सर्दी होत असेल तर त्यांनी तीळाच्या तेलात मिसळून ते तेल केसांच्या मुळाला लावावे. नाहीतर खोबरेल तेलात हा कापूर मिसळून ते तेल केसांच्या मुळाला लावावे. शक्यतो शनिवारी किंवा रविवारी हा प्रयोग केल्यास उत्तम. म्हणजे दुसऱ्या दिवशी न्हाऊन तुम्ही कामावर जायला मोकळे.

६) नेहमीच्या कापरात मेण असते. त्यामुळे हा कापूर शूद्ध असल्यामुळे त्याचा वापर धार्मिक कार्यांत करावा. आरती करताना, गंध उगाळताना त्यात टाकावे, देवाला विडा देताना कापूरमिश्रीत विडा देतात तो हाच कापूर. दक्षिण भारतात तीर्थांत वेलची आणि भीमसेन कापूर वापरतात. श्री बालाजी देवस्थानमधील सुप्रसिद्ध लाडवातीतही याचा उपयोग केला जातो.

७) दाढदुखीकरिता छोटासा खडा किडलेल्या दातात ठेवावा. तो आपोआप विरघळतो व लाळ पोटात गेल्यास काही अपाय होत नाही.

८) खोकल्याकरिता आयुर्वेदिक कंपन्या याच कापराचा उपयोग करतात.

९) सायंकाळी या कापराचे दोन लहान तुकडे हातामध्ये घेऊन घराची दृष्ट काढावी. घराबाहेर जुन्या पणतीत किंवा एखाद्या जुन्या भांड्यात हा कापूर जाळावा. प्रयोग करायला हरकत नाही. पूर्वी वास्तूची दृष्ट काढायचो तशी दृष्टच काढायची आहे. कदाचित योगायोगाने आपले कामही निश्चितपणे होईल.

### इतर उपयोग

१) प्रवासी बॅग/ कपडे साठवण्याच्या बॅगमध्ये कापूर ठेवला, तर कुबट वास किंवा ठेवणीचा वास न येता एक सुगंध येतो. कपड्यांना कसर, झुरळ लागत नाही. पावसाळ्यात विशेषतः कपडे चांगले वाळत नाहीत, ओलसर राहतात. मग असे कपडे बॅगमध्ये भरून कुबट वास येतो. तो कापूर ठेवल्याने जातो.



२) डास चावू नयेत म्हणून रात्री आपल्यासभोवती ठेवावे. डास फिरकत नाहीत. शिवाय इतर कीटक, उंदीर वगैरे लांब राहतात.

३) कधी शेकोटी किंवा चूल पेटविणे जर त्रासदायक असेल, तर काही कापराच्या वड्या ते काम सोपे करतात.

४) रुमालात काही कापूरचे खडे, रबर किंवा दोऱ्याने बांधून ठेवले तर रुमालाला सुगंध येतोच. मात्र तो कापूर हुंगायलाही सोपे पडते. चुकून रुमाल धुवायला गेला तरी हरकत नाही. डाग पडत नाही आणि साबणाने तो विरघळतही नाही.

५) गुडनाईट किंवा इतर मॅट जाळायच्या यंत्रात त्यावर कापूर ठेवून चालू करा. तो कापूर विरघळून हवेत सुगंध पसरेलच पण डासही पळून जातील. गुड नाईटपेक्षा जास्त सुरक्षित.

६) कापूर पायमोज्यात घालून ठेवा. त्याचा कुबट वास आणि त्यामुळे पायाला येणारा कुबट वास नाहीसा होईल. शिवाय मोज्यांमुळे जी खाज पायाला सुटते ती नाहीशी होईल.

### कापूर पवित्र का मानला जातो ?

शास्त्रानुसार देवी-देवतांनसमोर कापूर लावल्याने अक्षयपुण्याची प्राप्ती होते. ज्या घरात नियमितपणे कापूर जाळला जातो तेथे पितृदोष किंवा इतर प्रकारच्या दोषांचा प्रभाव राहत नाही. कापूर लावल्याने वातावरण पवित्र आणि सुगंधित होते. अशा वातावरणात देवता लवकर प्रसन्न होतात. कापूरच्या प्रभावाने घरातील वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि त्याच्या सुगंधाने आपल्या विचारातही सकारात्मकता येते.

### वैज्ञानिक महत्त्व

वैज्ञानिक संशोधनामुळे सिद्ध झाले आहे, की कापूरच्या सुगंधाने जीवाणू , विषाणू, लहान कीटक नष्ट होतात. त्यामुळे वातावरण शुद्ध राहते व आजार दूर राहतात.

### कापूरचे आणखी काही फायदे

१) सर्दी-पडसे व्हायची लक्षणे आसताना एका रुमालात ३-४ कापूर एकत्र करून त्यांचा वास घेतल्याने सर्दी-पडसे होत नाही.

२) कापूरचा सुगंध व्यवस्थित श्वासावाटे आत घेतल्याने तोंडाला घाण वास येत असल्यास निघून जातो.

३) कापूरच्या वासाने आपल्या मेंदूतील लेकवस्नामक रसायन अधिक सक्रीय होते. याचा उपयोग आपल्याला निर्णयक्षमतेत होतो.

४) कापूरचा रोज ३ वेळा सुवास घेतल्याने आपल्या नाकाची वास ओळखायची क्षमता वाढते.

५) घरात कापूर रोज लावल्यावे ऑक्सिजन ९-११ टक्के इतका वाढतो.

६) मूठभर कापूर तव्यावर ४० सेकंद तापवून ते एका रुमालात बांधून त्याचा शेक गळ्याला दिल्यास घसा बसला असेल तर बरा होतो. तसेच हा शेक भुवयांच्या वर दिल्याने चष्म्याचा नंबर कमी व्हायला मदत होते.

७) मूठभर कापूर + दालचिनी + लसूण एकत्र एका सुती कपड्यात बांधून गाडीच्या बोनेटच्या आत ही पूडी ठेवल्याने काही वेळ तरी उंदीर व घुशी येत नाहीत.

८) कापूर हा उगाच अती जाळू नये. कारण अतिधुराने डोळे झोंबतात आणि त्याचा वाईट परिणाम बुबुळाच्या पाठील टिशूस्वर होतो.

९) गरम पाण्यात मीठ व बराच कापूर टाकून त्यात पाय बुडवून ठेवल्याने दुखणे कमी होते. फुगलेल्या शीरा खाली बसतात. (पन्नाशी ओलांडलेल्यांना अधिक उपयोगी )

कापूरच्या सुगंधाने मनात एक नवचैतन्य निर्माण होते.

(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)